स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 27–12–2016** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| 2. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 3. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 4. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 5. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| 6. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| 7. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| 8. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| 9. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| 10. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 11. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 12. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| 13. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 2. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 3. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. जयंत दांडेगावकर, अति. उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 874 :– {हॉटमिक्स प्लॉन्ट} महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट एम. आय. डि. सी. हिगंणा करिता डाबंर एच.पि.सि.एल./बि.पि.सि.एल/आय.ओ.सि.एल रिफायनरीज मूबंई कडून डाबंर वाहतुक करण्याच्या कामाकरीता स्थायी समिती ठराव क्र. 69, दि.12.4. 2016 अन्वये मंजूर मे. एन. जि. अग्रवाल यांची निविदा रद् करून मे. कुज रोडवेज यांची प्राकलनिय दरापेक्षा 13.5% कमी दराची (CSR 2015-16 पेक्षा 13.5% कमी दर) रु. 59,30,046.00 राशीची निविदा स्वीकृत करुन निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयातील निविदा रद्द करण्याचे कोणतेही शास्त्रीय कारण विभागाचे स्पष्ट केले नाही. विभागाने सादर केलेला पस्ताव एकमताने नामंजूर स्थायी समिती ठराव क्र. 69 दिनांक 12.04.2016 नुसार विभागाने कार्यवाही कायम ठेवावी. जर कंत्राटदाराने योग्य अटी व शर्ती नुसार काम न केल्यास दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करावी यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 875ः—** **{लोककर्म झोन 04}** प्रभाग क्र. 26 ब येथील वुमन्स होम नॉर्थ अंबाझरी रोड मागील नाग नदीच्या सुरक्षा भिंत तयार करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी में. गीती कंन्स्ट्रक्शन कंपनी हयांची 12.8% दराची निविदा रूपये 24,07,699/— ( रूपये चौविस लक्ष सात हजार सहाशे नव्यानऊ रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्रमांक 618 (A43901370812) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 876ः—** **{लोककर्म झोन 08}** प्रभाग क्र. 33, ब डिप्टी सिंग्नल मध्ये विविध ठिकाणी कॉक्रेट पेव्हमेंट करण्यास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. भोले कंन्स्ट्रक्शन यांची —7.86 टक्के कमी दरांची रू. 23,65,596/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरीता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. ए 42001470511 मधुन आर्थिक वर्ष 2016—17 मध्ये रू. 26,00,000 लक्ष राशी तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे.

**ठराव क्रमांक 877ः—** **{लोककर्म झोन०४}** सहकार नगर अंतिम संस्कार केंन्द्रात प्रस्तावित एल. पि.जी. चलित शवदाहीनी करीता अंत्यसंस्कार हॉल सह विविध काम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी में. दिप कंन्स्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दराची निविदा रूपये 46,66,008/–( रूपये छेचाळीस लक्ष सहाष्ट हजार आठ रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 878ः—** **{लोककर्म झोन०४}** मानेवाडा अंतिम संस्कार केंन्द्रात प्रस्तावित एल. पि.जी. चलित शवदाहीनी करीता अंत्यसंस्कार हॉल सह विविध काम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी में. दिप कंन्स्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दराची निविदा रूपये 46,66,008/– (रूपये छेचाळीस लक्ष सहाष्ट हजार आठ रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 879ः—** **{लोककर्म झोन 06}** प्रभाग क्र. २८ ब मोमीनपूरा डोबीनगर श्री गुलाम रसूल ते श्री इरसाद नवसाद यांचे घरापर्यंत नाल्याची आर.सी.सी. भिंत बांधण्याचे कामास्तव प्राप्त मे. पटेल ॲण्ड शर्मा इन्फ्राटेक यांची प्राकलनिय दरांची रू. २५,९७,६९१/— रकमेची एकमेव निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 880ः—** **{हॉट मिक्स प्लॅन्ट}** मनपाच्या हॉट मिक्स प्लॉन्ट विभागाकरिता नवीन बॅच मिक्स प्लॉन्ट खरेदी करणे व उभारणे तसेच पुरक मशिनरी व वाहने आणि मनुष्यबळ दरकरारी भाडेतत्वावर घेवून चालविणे. या कामाकरितारू. 14,14,00,000/ – च्या एकत्रीत प्रस्तावास मान्यता देवून खालील प्रमाणे उपप्रस्तावात विभागणी करून स्वतंत्रपणे निविदा मागविण्यास अनुमती देणे.

| अ. क्र. | उप प्रस्ताव | खर्च रू. | पद क्रं. |
|---|---|---|---|
| 1 अ<br>1 ब | बॅच मिक्स प्लॉन्ट 124 TPH खरेदी<br>बॅच मिक्स प्लॉन्ट 124 TPH ची प्रतीवर्ष देखभाल/दुरूस्ती (A.M.C.) करिता पहिल्या वर्षी रू. 4 लक्ष, याप्रमाणे 10 वर्षा करिता सरासरी 100 लक्ष खर्च येईल (15 टक्के प्रतिवर्ष मागील दरावर दरवाढ गृहीत धरून) | 4,80,00,000/—<br>1,00,00,000/— | 671 (A 42001474614)<br>671 (A 42001474614) |
| | **1 अ + 1 ब** | **5,80,00,000/—** | 671 (A 42001474614) |
| 2 | पुरक मशिनरी व वाहने इत्यादी भाडेतत्वावर घेण्याकरिता 2 वर्षाच्या दराकरारासाठी दर निश्चिती करून काम करणे. | 8,34,00,000/— | 677 (A 42001474710) |
| | **एकूण** | **14,14,00,000/—** | |

तसेच उपरोक्त प्रत्येक उपप्रस्तावापुढे नमूद पदांमध्ये तरतूद उपलब्ध करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 881</u>:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. ७ अ व ब झिंगाबाई टाकळी झेंडा चौक ते शफीनगर, गायत्रीनगर, संत ज्ञानेश्वर सोसायटी, जय दुर्गा सोसायटी बन्धुनगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव निविदा मागविल्या असता मे. एस.के. गुरूबक्षाणी यांची मुळ प्राकलनिय दराची रू. २९,९८,०२६/— (एकोणतीस लक्ष अठ्ठयानऊ हजार नऊशे सव्वीस फक्त) ची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 882</u>:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 33, ब डिप्टी सिंग्नल पाणी टंकी जवळ ना. सु. प्र. हॉट मिक्स प्लॉन्ट मागे सिंमेट कॉंक्रीट रस्ता बांधकाम करण्यास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. गुरूदयाल राऊत यांची —12.84444 टक्के कमी दरांची रू. 22,65,354/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरीता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. ए 42001470511 मधुन आर्थिक वर्ष 2016—17 मध्ये रू. 26,00,000 लक्ष राशी तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे.

<u>ठराव क्रमांक 883</u>:— {विद्युत विभाग} "नागपूर शहरातील दहा झोन्स् अंतर्गत अस्तित्वात असलेले पारंपारीक पथदिवे (सोडीयम व्हेपर, मेटल हलाईड, टयुब लाईट्स, सि.एफ.एल. इत्यादी) उर्जाकार्यक्षम एल.ई.डी. पथदिव्यांनी बदलविणे तसेच हे संपूर्ण पथदिवे ज्या यंत्रणेत आहेत त्या यंत्रणेतील निकामी केबल्स् बदलणे, तुटलेल्या खांबाच्या ठिकाणी नविन खांब बसविणे इत्यादी कामे ८४ ई.एम.आय. (इक्वेटेड मंथली इन्स्टॉलमेंटस्) व्दारा परतफेड करण्याच्या धर्तीवर बदलणे, मेट्रो रेल रुट वरील प्रकाश व्यवस्थेचे नविनीकरण करणे व रिंग रोड वरील प्रकाश व्यवस्थेचे नविनीकरण करण्याचे कामाचे रेग्युलर पध्दतीने भुगतान करणे व या संपूर्ण यंत्रणेची संपूर्ण कंत्राटाच्या काळात (१५ महिन्यांचा जेस्टेशन पिरीअड + ८४ महिन्यांचा परतफेडीचा काळ = ९९ महिने) देखभाल दुरुस्ती करणे" या कामाकरीता बोलाविण्यात आलेल्या निविदांमधे या निविदेतील विविध भागांकरीता खालीलप्रमाणे प्राप्त सुधारीत निविदा दर मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेवून,

१) पार्ट 'ए' (A) इन्फ्रास्ट्रक्चर स्ट्रेन्दनींग (संपूर्ण नागपूर शहरातील पथदिव्यांच्या यंत्रणेतील निकामी केबल्स् बदलणे, तुटलेल्या खांबाच्या ठिकाणी नविन खांब बसविणे इत्यादी कामे ८४ ई.एम.आय. (इक्वेटेड मंथली इन्स्टॉलमेंटस्) व्दारा परतफेड करण्याच्या धर्तीवर बदलणे) :

रु. ५९.०३ कोटी या निविदेत नमूद राशीच्या कामापैकी निविदा अटी शर्तीनुसार प्रत्यक्षात जे काम होईल व ज्यावेळेस होईल त्या रकमेच्या ८०% टक्के अधिक दराने येणा-या रकमेचे ८४ ई.एम.आय. रुपाने भुगतान करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

२) पार्ट 'बी' (B) {नागपूर शहरातील दहा झोन्स् अंतर्गत अस्तित्वात असलेले पारंपारीक पथदिवे (सोडीयम व्हेपर, मेटल हलाईड, टयुब लाईट्स, सि.एफ.एल. इत्यादी) उर्जाकार्यक्षम एल.ई.डी. पथदिव्यांनी ८४ ई.एम.आय. (इक्वेटेड मंथली इन्स्टॉलमेंटस्) व्दारा परतफेड करण्याच्या धर्तीवर बदलणे) :

रु.१५८.९९ कोटी या निविदेत नमूद राशीच्या कामापैकी निविदा अटी शर्तीनुसार प्रत्यक्षात जे काम होईल व ज्यावेळेस होईल त्या रकमेच्याा ७०% टक्के अधिक दराने रकमेचे ८४ ई.एम.आय. रुपाने भुगतान करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

३) पार्ट 'सी' (C) (C-1) मेट्रो रेल रुट वरील प्रकाश व्यवस्थेने नविनीकरण करण्याच्या

रु. १४.८९ कोटी या प्राकलनीय रकमेच्या तुलनेत १% कमी दर (म्हणजेच रु.१४.७ कोटी) मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून यास एकमताने मंजुरी

कामाचे रेग्युलर पध्दतीने भुगतान करणे : प्रदान केली.

(C-2)रिंग रोडवरील प्रकाशव्यवस्थेचे नविनीकरणापोटी करावयाच्या कामाचे रेग्युलर पध्दतीने भुगतान करणे (स्थायी समिती ठराव क्र. ७६९ दिनांक १८.११.२०१६ चे अनुषंगाने नव्याने समाविष्ट करण्यात आलेला भाग):

अ) रु.१३.३६ कोटी या प्राकलनीय रकमेच्या तुलनेत १%कमी दर (म्हणजेच रु. १३.२२ कोटी) मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ब) तसेच निविदा अटी शर्तीप्रमाणे हे काम पूर्ण झाल्यानंतर अश्याप्रकारचे कामाची इतर ठिकाणी आवश्यकता भासल्यास प्रत्यक्ष काम करण्याचे वेळी लागु असलेल्या विभागीयदरसुची नुसार व याबाबतीत निविदेत मंजूर अटी शर्तीनुसार अश्या दराच्या १%कमी दराने काम करवून घेण्याचा प्रश्न,आवश्यकता भासल्या सक्षम प्राधीकारणीकडुन अश्या खर्चाची मंजूरी प्राप्त करुन घेण्याचे अधिन राहुन मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

४) पार्ट 'डी' (D)

D-I (पारंपारीक पथदिव्यांचा देखभाल दुरुस्तीचा खर्च) : रु. ८२ प्रती पथदिप (पारंपारीक पथदिप) प्रती माह (प्रथम १५ महिन्याकरीता)

व

D-II (एल.ई.डी. पथदिव्यांचा देखभाल दुरुस्तीचा खर्च) : रु. ६६ प्रती पथदिप (एल.ई.डी.पथदिप) प्रती माह यាप्रमाणे एकूण ९९ महिन्यांच्या काळात प्रथम १५ महिन्यानंतर एका वर्षाकरीता व त्यानंतर दरवर्षी १०% दर वाढीसह याप्रमाणे एकूण रु.११६.३९ कोटी किंवा प्रत्यक्षात पथदिव्यांच्या संख्येनुसार जी राशी असेल त्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

५) पार्ट 'ई' (E) (पारंपारीक पथदिव्यांचा देखभाल दुरुस्तीकरीता सुटया भागांचा पुरवठा करणे) :

40/36 W टयुब रॉड : Rs.46 /- each (आयटम क्र.१),
50 W सो.व्हे.लॅंप : Rs.380/- each (आयटम क्र.२) ,
70 W सो.व्हे.लॅंप : Rs.280 /- each (आयटम क्र.३),
150 W सो.व्हे.लॅंप : Rs.380 /- each (आयटम क्र.४),
250 W सो.व्हे.लॅंप : Rs.460 /- each (आयटम क्र.५),
70 W एम.एच.लॅंप : Rs.545 /- each (आयटम क्र.६),
150 W एम.एच.लॅंप : Rs.675 /- each (आयटम क्र.७),
250 W एम.एच.लॅंप : Rs.745/- each (आयटम क्र.८) ,
400 W एम.एच.लॅंप : Rs.790/- each (आयटम क्र.९),
40 W बॅलास्ट : 175/- each (आयटम क्र.१०),
50 W: सो.व्हे./एम.एच. बॅलास्ट Rs. 725/- each (आयटम क्र.११),
70 W सो.व्हे./एम.एच. बॅलास्ट: Rs.725 /- each (आयटम क्र.१२),
150 W सो.व्हे./एम.एच. बॅलास्ट: Rs.1050 /- each (आयटम क्र.१३),
250W सो.व्हे./एम.एच.बॅलास्ट:Rs.1450/-each/-each(आयटम क्र.१४),
400 W सो.व्हे./एम.एच. बॅलास्ट Rs.1900 /-each (आयटम क्र.१५) ,
टयुब स्टार्टर : Rs.11 /- each (आयटम क्र.१६),
50/70/150/400 W 230 V सो.व्हे./एम.एच. इग्नाईटर Rs. 140 /- each (आयटम क्र.१७).

वर नमूद आयटम क्र.१ ते १७ चे दर मंजूर करण्याचा प्रश्न सुरुवातीच्या काळात आवश्यक तेवढे साहित्य खरेदी करण्यास व जस – जसे पारंपारीक पथदिवे एल.ई.डी. पथदिव्यांनी बदलण्यात येतील तस – तसे

निघालेल्या पारंपारीक पथदिव्यांतील साहित्य देखभाल दुरुस्ती करीता वापरण्यात येईल या अटीवर मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

६) पार्ट 'एफ' (F) काढण्यात येणा-या पारंपीक पथदिव्यांची (लॅंप, चोक इत्यादी साहित्य वगळता) विक्री करणे. — एल.ई.डी. पथदिवे लावल्यानंतर निघालेले पारंपारीक पथदिवे या पथदिव्यातील लॅंप, चोक इत्यादी साहित्य काढून शिल्लक राहीलेला भाग विक्री करण्यास प्राप्त दर कमी असल्याने फक्त या 'F' भागाकरीता प्राप्त दर नामंजूर करुन; भंगार खरेदी करणा-या कंत्राटदाराकडून याकरीता निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

व संपुर्ण दहा झोन्स्मधे या झोन अंतर्गत सद्यःस्थितीत निविदेत नमूद पथदिव्यांची संख्या यामधे पथदिव्यांच्या सर्किटस् प्रमाणे विभागणी करणे, मेट्रो रेल व रिंग रोड वरील दिव्यांचे तसेच लगतच्या परिसरातील पथदिवे याकरीता कमीत कमी स्विचींग पॉईंटस् ठेवण्याचा विचार करता ही पथदिव्यांची झोननिहाय संख्या शक्यतो समान (±२००० पथदिवे) राहील याप्रमाणे पुर्नविभागणी करण्याचे अधीन राहून तसेच निविदाकारांनी वर नमूद निम्नतम सुधारीत दरावर काम करण्याची तयारी दर्शविली असल्याचे अनुषंगाने, त्यांनी दिलेल्या विकल्पाच्या अनुषंगाने व एकपेक्षा जास्त झोनचे काम करण्याची तयारी दर्शविल्याचे अनुषंगाने खालीलप्रमाणे झोननिहाय काम देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

१) झोन क्र. १ चे काम मे. साधना ईलेक्ट्रीक वर्क्स, नागपूर.
२) झोन क्र. २ चे काम मे. निशांत ईलेक्ट्रीकल्स, नागपूर.
३) झोन क्र. ३,४ व ७ चे काम मे. सोनु ईलेक्ट्रीकल्स, नागपूर.
४) झोन क्र. ५ चे काम मे. दत्त ईलेक्ट्रीकल्स, नागपूर.
५) झोन क्र. ६ चे काम मे. लिंक एन्टरप्रायझेस, नागपूर.
६) झोन क्र. ८ चे काम मे. राहुल कंस्ट्रक्शन्स, नागपूर.
७) झोन क्र. ९ चे काम मे. अनिल ईलेक्ट्रीकल्स ॲन्ड असोशीएटस्, नागपूर.
८) झोन क्र. १० चे काम मे. बालाजी असोशीएटस्, नागपूर.

या कंत्राटातील साहित्याची तपासणी त्रयस्थ संस्थेकडुन करण्याचे अधिन राहून मंजूरी प्रदान करण्याचा तसेच में. जे.के. सोल्यूशन्स इंक, नागपूर यांना नागपूर "शहरातील मुख्य रस्त्यांवरील व मोठी मैदाने येथील पारंपारीक पथदिवे एल.ई.डी. पथदिव्यांनी उर्जा बचतीच्या रकमेतून खर्च वळता करण्याच्या धर्तीवर बदलणे तसेच या दिव्यांच्या यंत्रणेचे मजबूतीकरण (निकामी केबल्स बदलणे, तुटलेल्या खांबांच्या ठिकाणी नविन खांब बसविणे इ.) करणे" या कामाचे कार्यादेश क्र. एल.डी./ई.ई./०१/३९८, दि. १७.०५.२०१४ अन्वये देण्यात आलेले कंत्राट रदद् करण्याची कार्यवाही करण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर या रदद् करावयाच्या कंत्राटात समाविष्ट पथदिव्यांचा वरील कंत्राटात समावेश करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच स्थायी समिती ठराव क्र. 526 दिनांक 12.09.2016 अन्वये नागपूर शहरातील संपूर्ण पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या झोन निहाय सूरु असलेल्या कामास दिनांक 31.12.2016 पर्यंत मुदतवाढ देण्यास तसेच या कामाच्या रु. 750 लक्षच्या भूगतान करण्यास एकमताने मंजूरी, तसेच इन्फ्रास्ट्रक्चर स्ट्रेंदनिंग कामाकरिता कंत्राटदाराने काम केल्यानंतर ई.एम.आय. रुपाने देय असणाऱ्या रकमेचा विचार करता महानगरपालिकेने बॅंके तर्फे कामाची संपूर्ण रक्कम एकमुश्त वळती केल्यास म.न.पा. चा आर्थीक फायदा होत असल्यास तसा तपासून प्रशासनाने त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली. .

<u>ठराव क्रमांक 884</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर